|| ॐ गं गणपतये नमः ||

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

कार्यालयीन पत्ता : " गणपती भवन "
२५०, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
दूरवाणी : २४४७९२२२, २४४३०५२७
फॅक्स : २४४९३९३९

शैक्षणिक संकुल : " गणपती सदन "
१३२, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
दूरवाणी : २४४९२०००, २४४९६४६४
फॅक्स : २४४९८९८९

– प्रेसनोट प्रसिध्दीसाठी –

# दगडूशेठ गणपती मंदिर हे भक्तांचे श्रद्धाकेंद्र

### परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज ; श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये गणरायाचे दर्शन व महाआरती

पुणे : दगडूशेठ गणपती मंदिर पुण्यातील प्रसिद्ध, लोकांच्या श्रध्देचे आणि भक्तीचे प्रमुख स्थान आहे. हे गणपती मंदिर भक्तांचे एक श्रद्धाकेंद्र आहे. मंदिरात महागणपतीचे सानिध्य जाणवते. इथे येऊन दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊन मन प्रसन्न झाले, असे परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज यांनी सांगितले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज मंदिरात आले होते. यावेळी दगडूशेठ गणपती ट्रस्ट तर्फे बॅंडच्या सुरावटी व फुलांच्या पायघडयांनी त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज यांनी गणपतीची पूजा, आरती देखील केली. यावेळी पंडित वसंतराव गाडगीळ, ट्रस्टचे अध्यक्ष अशोक गोडसे, सुनील रासने, महेश सुर्यवंशी, उल्हास भट, राजाभाऊ घोडके, बाळासाहेब सातपुते, अक्षय गोडसे, मंगेश सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज म्हणाले, देवाचे अस्तीत्व दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये प्रखरतेने जाणवत आहे. जोपर्यंत सूर्य आणि चंद्र असेल तोपर्यंत देवाचे अस्तीत्व इथे असेल. देव करुणासमुद्र, कृपासागर असून जो देवाची मनापासून प्रार्थना करेल त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतील, असे त्यांनी गणेशभक्तांनी उद्देशून सांगितले. यापूर्वी देखील पीठाधिश मंदिरात येऊन गेले आहेत.

***फोटो ओळ** : श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी परमपूज्य श्रृंगेरी जगद्गुरु श्रीशंकराचार्य श्रीविधुशेखरभारती स्वामीमहाराज मंदिरात आले होते. यावेळी गणेशचरणी नमन करताना श्रीशंकराचार्य.

*** माध्यम समन्वयक :-**

**ग्लोबल मीडिया, पुणे – मो. ९०२८७८७०५८, ९०२८४२६३४५**